पुणे शहर पोलीस

# दर्पण

ऑक्टोबर २०१९

## Appreciation Letter...

Dear Dr. Venkatesam,

Good Morning

Day before yesterday, I had to take my Mother in Law, aged 97+ and barely able to walk, to a doctor on Siddharth road off Max Mueller Bhavan road.

There was no parking on the side near the doctor. So I asked the traffic cop to allow me to park, which he willingly did. After taking her into the clinic I parked my car in the correct location.

After the doctors appointment was over, I brought my car to the earlier location. A traffic police constable's came there and graciously and politely helped to get her settled in. The police constable's name was 'Nana' and he joined the police after a stint in the army. He was later talking to his superior on the walky-talky and I talked to her to commend Nana for being what a policeman should be.

It is good to meet a policeman who cares. May there be many more "Nanas".

Thank you
Sincerely

# वाहतुक सुलभता

वाहतुक सुलभता



# हडपसरमध्ये १६८ रिक्षांवर कारवाई

## जाधव ६३ रिक्षाचालकांकडून १२ हजार ६०० रुपये दंड वसूल

। पुणे : प्रतिनिधी

**रिक्षा चालविण्याचा परवाना, परमिट नाही, तसेच गर्दीच्या ठिकाणी थांबून वाहतुकीला अडथळा करीत असलेल्या १६८ रिक्षांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला. हडपसर गाडीतळ चौक, मंत्री मार्केट, गांधी चौक, मगरपट्टा चौक येथे हडपसर वाहतूक विभागाच्या वतीने शुक्रवारी (दि. ११ ऑक्टोबर) कारवाई केल्यामुळे रिक्षाचालकांचे चांगलेच धाबे दणाणले.**



दरम्यान, गणवेश, बॅज, नोपार्किंगमध्ये असलेल्या ६३ रिक्षाचालकांना प्रत्येकी दोनशे रुपये दंड आकारून सोडून देण्यात आले. उर्वरित रिक्षा पोलिसांनी ताब्यात घेतल्या आहेत, असे हडपसर वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक राजेंद्र जाधव यांनी सांगितले.

हडपसरमध्ये वाहतुकीला अडथळा ठरत असलेल्या रिक्षांवर कारवाई करण्याच्या सूचना पोलीस आयुक्त के. वेंकटेशम आणि पोलीस उपायुक्त पंकज देशमुख यांनी दिल्या होत्या. त्यानुसार कारवाई करण्यात आल्याचे हडपसर वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक राजेंद्र जाधव यांनी सांगितले. या कारवाईप्रसंगी हडपसर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव यांचे सहकार्य लाभले.

पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर म्हेत्रे, पोलीस उपनिरीक्षक बापूसाहेब हंबीर, गजानन भोसले, दिनेश टपके, मनोज ठाकरे, संतोष कदम, तेजस भोसले, सुनील बोरकर यांच्या पथकाने ही कारवाई केली. रिक्षा आणि रिक्षाचालकांची कागदपत्रे तपासून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली. कारवाई केलेल्या १६८ रिक्षा हडपसर पोलीस स्टेशनच्या जागेवर ठेवल्या असून, कागदपत्रांची तपासणी आणि दंड आकारून रिक्षाचालकांना रिक्षा देण्यात येणार आहेत, असे जाधव यांनी सांगितले.

The Indian EXPRESS - 23 October, 2019

# After RTO falls short, traffic cops to keep a check on private bus fares in festive season

EXPRESS NEWS SERVICE
PUNE, OCTOBER 22

AFTER THE Regional Transport Office (RTO) failed to rein in private bus operators from overcharging passengers during the festive season, Pune Traffic Police is trying to put an end to the arbitrary and exploitative pricing of tickets by private luxury bus operators.

In a meeting with private bus operators and travel booking agents on Tuesday, Deputy Commissioner of Police (DCP) Pankaj Deshmukh said Pune Traffic Police was launching a campaign to stop overcharging by private operators.

In April 2018, the state government had fixed the maximum fare that private buses were allowed to charge from passengers. Private bus operators could charge a maximum of 50 per cent more for each km compared to the state-owned Maharashtra State Road Transport Corporation (MSRTC) buses in the same category (non-AC seater, AC seater, non-Ac sleeper, AC-sleeper).

This was done in response to a public interest litigation filed by Pune-based social activist Asim Sarode in April 2012 in the Bombay High Court.

The court had directed the state government to fix the fare of private buses plying on the contract-carriage permit. The state had asked Pune-based Central Institute of Road Transport (CIRT) to come up with a formula to calculate the maximum fare for private buses.

The move was expected to bring relief for migrant workers and students who are from other parts of the state. The RTO, however, has failed to implement the norms and cited staff shortage as a reason.

DCP Deshmukh said, "Traffic Police will take action against bus operators or booking agents who violate the norm fixed by the state government. Also, traffic personnel in civil clothes will keep an eye on ticket bookings at important locations in the city and catch and penalise those who are found overcharging passengers."

He also directed private bus owners to arrange all necessary facilities, such as drinking water, toilets and CCTV cameras, for passengers at the parking lots. "We have asked them to deploy security guards to ensure the safety of passengers and regulation of traffic in the parking lots. Another precaution they are supposed to take is to ensure that passengers are not fleeced by auto-rickshaw drivers after they reach the city," said Deshmukh.

# वाहतूक पोलिसांचे दिवाळी 'गिफ्ट'

## 'डिस्काउंट कूपन' अधिक दुकानांत वापरता येणार

म. टा. प्रतिनिधी, पुणे

### कूपनबद्दल महत्त्वाचे...

- आतापर्यंत ४५,१०६ जणांना दिले कूपन
- दररोज २५० ते ३०० जण ऑनलाइन कूपन घेतात
- ११५ दुकाने या योजनेत सहभागी
- एकाच कूपनवर महिनाभरात ११५ दुकानांत लाभ घेणे शक्य
- एक कूपन, एका महिन्यात, एका दुकानात एकापेक्षा अधिक वेळा वापरता येणार नाही

'आभार' योजनेअंतर्गत वाहनचालकांना वाहतूक पोलिसांकडून दिले जाणारे एक 'डिसकाउंट कूपन' आता एकापेक्षा अधिक दुकानांत वापरणे शक्य होणार आहे. यापूर्वी एक 'कूपन' एकाच दुकानात वापरता येत होते. वाहनचालकांना नियम पाळण्यासाठी अधिकाधिक प्रोत्साहित करण्यासाठी वाहतूक पोलिसांनी या योजनेत बदल केला आहे.

वाहतूक नियमभंग केल्याप्रकरणी दंड प्रलंबित नसलेल्या वाहनचालकांना वाहतूक पोलिसांकडून 'डिसकाउंट कूपन' देण्याची आभार योजना जून महिन्यात सुरू करण्यात आली होती. वाहतूक पोलिस नाकाबंदीच्या दरम्यान वाहन चालकांचा प्रलंबित दंड तपासून पात्र वाहनचालकांना कूपन देत होते. त्यामध्ये ऑक्टोबरच्या सुरुवातीला बदल करून, वाहन चालक स्वतःदेखील ऑनलाइन पद्धतीने डिस्काउंट कूपन प्राप्त करू शकतील, अशी सुविधा देण्यात आली.

या योजनेला अधिकाधिक प्रतिसाद मिळून, नागरिकांमध्ये नियम पाळण्याबाबत जागृती व्हावी, यासाठी पुन्हा बदल केला आहे, अशी माहिती वाहतूक पोलिस शाखेचे उपायुक्त पंकज देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या योजनेअंतर्गत वाहनचालकांना दिल्या जाणाऱ्या 'डिस्काउंट कूपन'द्वारे किमान शंभर रुपये आणि कमाल दहा टक्क्यांपर्यंत सूट मिळते. वाहनचालक त्यांच्या वाहनावर दंड प्रलंबित आहे की नाही, हे mahatrafficechallan.gov.in/paychallan या वेबसाइटवर पाहू शकतात. संबंधिताच्या नावे कोणताही थकीत दंड किंवा खटला नसल्यास, तेथूनच ते 'डिस्काउंट कूपन' मिळवू शकतात.

# Traffic police will dispense rewards via online wallet

## Under Aabhaar Yojana, a clean road record gets ₹1k off for flights, ₹100 off on bus trips

For months, the city's traffic police have been rewarding people who follow road rules — and the gifts are now set to get more elaborate. From Tuesday onwards, they have roped in a leading e-commerce payment system, setting up discounts for flights and bus travel for those adhering to traffic norms.

People with a clear traffic record can now avail of a discount of up to Rs 1,000 for flights and Rs 100 on buses through the Paytm app and website, with a coupon generated on the official traffic department website by submitting one's vehicle registration number and chassis number.

Deputy commissioner of police (DCP-traffic) Pankaj Deshmukh told *Mirror*, "People have approved of our initiatives. They are also supporting it by following laws better. Earlier, when we handed over gift coupons to law-abiding citizens in person, there was a limit — but online, everyone who doesn't have a challan can avail of them. The response received to this reward drive has been tremendous. The ambit is across Pune and Pimpri-Chinchwad."



**Cops have been rewarding people for following road rules for months**

A traffic police inspector from Swargate division, who didn't wish to be named, said, "The drive has gained momentum within months — some people interact with us daily and ask for coupons for their clean records." Such people, said the cop, can now directly choose a coupon and apply for it at *mahatrafficechallan.gov.in/payechallan*.

Earlier, police had said most Punekars use these coupons at eateries, with Chitale Bandhu being one of the top choices.

A recipient of a discount through this Aabhaar Yojana, Sandesh Tribhuvan told *Mirror*, "My friends and I have been receiving these coupons frequently — it truly does give people incentive to obey all traffic rules. We also work as police mitras through college and feel it is important to be law-abiding. Most of our coupons are used to order from food aggregators, like Swiggy and Zomato."

— PMB

प्रभात – दि. १३ ऑक्टोबर, २०१९

# अवजड वाहनांवर कारवाईचा बडगा

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १२ - जानेवारी ते सप्टेंबर या कालावधीत शहरांतील अपघातांची संख्या घटली आहे; परंतु या कालावधीमध्ये सुमारे ३३ गंभीर अपघात अवजड वाहनांमुळे झाल्याचे वाहतूक विभागाकडून सांगण्यात आले. वाहतूक पोलिसांकडून सुरक्षित वाहतुकीसाठी घालून देण्यात आलेले नियम वाहनचालकांकडून धाब्यावर बसवण्यात येत आहेत. त्यामुळे या प्रकाराला आळा घालण्यासाठी वाहतूक विभागाने कारवाईचा बडगा उगारला आहे.



## चालकांनी वेगमर्यादेचे पालन करावे

नियमांचे उल्लंघन करत ट्रक आणि डंपर आदी अवजड वाहने चालवणाऱ्यांनी वेगमर्यादेचे पालन करावे. यासह प्रवेशबंदीबाबत पोलिसांनी दिलेल्या आदेशाचे पालन करणे गरजेचे आहे. पुढील काळामध्ये देखील वाहतूक विभागाकडून कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलीस निरीक्षक (नियोजन) शुभदा शितोळे म्हणाल्या.

शहराच्या मध्यवर्ती भागांसह उपनगरांमध्ये जड वाहतुकीचे प्रमाण जास्त आहे. भरधाव डंपरचालकांच्या बेदरकारपणामुळे गंभीर स्वरूपाचे अपघात घडले आहेत. विमाननगर भागासह पुणे-नगर रस्त्यावर जड वाहनांना पीक अव्हर्स दरम्यान प्रवेश बंदी केलेली आहे. मात्र, पोलिसांच्या आदेशाचे पालन न करता वाहने आत आणणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. अशा वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

विमानतळ वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक जितेंद्र कोळी आणि त्यांच्या पथकाने नुकतीच कारवाई केली. प्रवेशबंदीची वेळ

## आठ डंपरचालकांकडून ५ लाख ७० हजारांचा दंड केला वसूल

झुगारून या भागातून जाणाऱ्या आठ डंपरचालकांवर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून ५ लाख ७० हजार ७०० रुपयांचा दंड वसूल केला आहे. तर जानेवारी ते सप्टेंबर या कालावधीमध्ये ट्रकमुळे सुमारे २१ आणि डंपरमुळे सुमारे १२ अपघात झाले आहेत, अशी माहिती वाहतूक विभागाकडून देण्यात आली.

## वाहतूक शाखेच्या वतीने 'रस्ता सुरक्षा अभियान'

# वाहन शिस्तबद्ध पद्धतीने वापरण्याची गरज

**पुणे, दि. १३** - रस्ता सुरक्षेच्या नियमांचे पालन न केल्यास गंभीर अपघात होण्याची शक्यता असते. मनुष्याच्या मेंदू व्यतिरिक्त अन्य भाग ऑपरेशनद्वारे बदलता येऊ शकतो; परंतु मेंदू बदलता येत नाही. त्यामुळे हेल्मेट वापरणे गरजेचे आहे. सध्या रस्ता आणि वाहन हा तरुणाईच्या जीवनाचा अविभाज्य घटक झाला आहे. तरुणाईने वाहने अतिशय जबाबदारीने आणि शिस्तबद्ध पद्धतीने वापरण्याची गरज आहे, असे मत वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक राजेश पुराणिक यांनी व्यक्त केले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते.

पूना इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स अँड इन्टरप्रिनरशिप या महाविद्यालयामध्ये वाहतूक शाखेच्या वतीने 'रस्ता सुरक्षा अभियान'चे आयोजन केले होते. यावेळी महाविद्यालयाचे डॉ. शकील अहमद, पोलीस निरीक्षक पुराणिक आदी उपस्थित होते.

आपण नियमांचे पालन करीत नसल्याने किंवा अनुशासन नसल्याने वाहतुकीचे प्रश्न गंभीर होत आहेत, असे पुराणिक यांनी नमूद केले. सीसीटीव्हीद्वारे करण्यात येणारी कारवाई, डीजीलॉकर आणि सतर्क पुणेकर या ॲप्सबाबत व्हिडिओ दाखवून त्याचा दैनंदिन जीवनातील उपयोग पुराणिक यांनी स्पष्ट केला.

### ११ हजार ९६५ विद्यार्थ्यांचे समुपदेशन

वाहतूक शाखेकडून आता महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्यात येत आहे. मागील ३ महिन्यांत ५२ महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये 'रस्ता सुरक्षा अभियान'अंतर्गत सुमारे ११ हजार ९६५ विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्यात आले.

प्रभात – दि. १९ ऑक्टोबर, २०१९



वानवडी : रिक्षा चालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाई केली.

# वानवडी येथे पोलिसांची रिक्षा चालकांवर कारवाई

प्रभात वृत्तसेवा

**वानवडी, दि. १८** - वानवडी वाहतूक पोलीस विभाग डी व्हिजन हद्दीत रिक्षा चालकांवर गणवेश न घालणे बाबत कारवाई करण्यात आली. मोटर वाहन कायद्याप्रमाणे प्रत्येक रिक्षा चालकाला रिक्षा व्यवसाय करत असताना कायद्याने ठरवून दिलेला गणवेश परिधान करणे अनिवार्य आहे. त्यामुळे गणवेश परिधान नसणाऱ्या अशा १७ रिक्षा चालकांवर यांच्यावर कारवाई करण्यात आली असल्याचे वानवडी वाहतूक विभागाचे प्रमुख पीआय राजेंद्र विभांडीक यांनी सांगितले.

स्वतः रिक्षा चालक हा मालक असेल तर त्यास पांढऱ्या रंगाची शर्ट-पॅन्ट व जर रिक्षा ही भाडेतत्त्वावर घेऊन चालण्यात येत असेल तर खाकी रंगाचा शर्ट-पॅन्ट घालणे बंधनकारक आहे तसेच रिक्षा चालवत असताना चालकाकडे बॅच बिल्ला असणे कायद्याने बंधनकारक आहे.

करण्यात आलेल्या कारवाईमध्ये या रिक्षा ट्रफ क्लब येथील वानवडी वाहतूक पोलीस चौकी येथे जप्त करण्यात येऊन जामर लावण्यात आले आहे. दंडाची रक्कम भरल्यानंतरच रिक्षा सोडण्यात येणार आहेत. रिक्षांवर ही कारवाई वाहतूक पोलीस निरीक्षक राजेंद्र विभांडीक, पोलीस कर्मचारी कुरले, लिंगाना, ननेकर, जाधव, भोकरे यांच्या पथकाने केली आहे.

Sakal Times - 8 October, 2019

# Eight dumper drivers fined ₹5.7 lakh

**ST CORRESPONDENT**
reporters@sakaaltimes.com

**PUNE:** Coming down heavily on dumper drivers, officials of the Pune traffic police penalised 8 dumper drivers, for allegedly violating traffic rules including that of overloading and driving during non-permissible hours.

The action was taken by Police Inspector Jitendra Koli from Airport traffic division as per directions of Deputy Commissioner of Police (Traffic) Pankaj Deshmukh.

Officials said that all 8 dumpers were nabbed and a check was done as per norms of RTO. It was found that 7 of the 8 dumpers caught were overloaded and a fine of Rs 5.7 lakh was collected from them. Police said that such action will continue to deter drivers violating traffic rules.


सकाळ – दि. २० ऑक्टोबर, २०१९

# अल्पवयीनांच्या बेफिकीरीला लगाम

कल्याणी फडके

**पुणे, दि. १९ -** अल्पवयीन मुलांकडून वाहतुकीचे नियमभंग होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. बेदकार आणि बेफिकीरपणे गाडी चालवणाऱ्या अल्पवयीन मुलांवर वाहतूक पोलिसांकडून कारवाई करण्यात येते. यंदाच्या वर्षात वाहतूक शाखेने सुमारे १९५ जणांवर कारवाई केली आहे.

कारवाई करून पालक आणि मुलांना याबाबत अधिक गांभीर्य नसल्याचे चित्र शहरात दिसते. कारवाई करण्यात येणाऱ्या मुलांच्या पालकांना वाहतूक पोलिसांकडून समज देखील देण्यात येत आहे. याशिवाय वाहतूक शाखेकडून खटला देखील दाखल करण्यात येतो. अल्पवयीन मुलांवर कारवाई करण्याबरोबर त्यांना वाहन चालवण्यास देऊ नये, असे आवाहनही वाहतूक पोलिसांच्या वतीने करण्यात येत आहे. नियम आणि कायदे करून देखील नागरिकांकडून याला प्रतिसाद मिळत नसल्याचे चित्र दिसत आहे. कारवाई करण्यात येणारी मुले बहुतांश वेळा विनापरवाना वाहन चालवतात. प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून १६ ते १८ वयोगटातील मुलांसाठी पालकांच्या संमतीने विशेष लायसन्स दिले जाते खरे. हे लायसन्स ५० सीसीपेक्षा कमी क्षमता असणाऱ्या गाड्या चालवण्यासाठी दिले जाते. मात्र, सध्या बाजारात कोणतीच गाडी ५० सीसीची उपलब्ध नाही.



**वाहतूक पोलिसांकडून १९५ जणांवर कारवाई : पोलिसांच्या आवाहनाला मिळेना प्रतिसाद**

“ १६ ते १८ वयोगटांतील विद्यार्थी सर्रास गाडी चालवतात. विद्यार्थ्यांनी निदान स्वतःची सुरक्षितता लक्षात घेता वाहन वेगाने नये. नियमांचे पालन न केल्याने जीवन आणि करिअरवर परिणाम होऊ शकतो, हे विद्यार्थ्यांनी लक्षात घेणे आवश्यक आहे. यासह पालकांनी देखील अल्पवयीन मुलांच्या हातामध्ये गाडी देऊ नये. रस्ता सुरक्षेच्या नियमांचे पालन न केल्यास गंभीर अपघात होण्याची शक्यता असते. दिवसेंदिवस रस्ता आणि वाहन तरुणाईच्या जीवनाचा अविभाज्य घटक होत आहे; परंतु तरुणाईने वाहन जबाबदारीने आणि शिस्तबद्ध पद्धतीने वापरणे गरजेचे आहे.

– राजेश पुराणिक,
पोलीस निरीक्षक, वाहतूक विभाग

## वाहतूक शाखेकडून महाविद्यालयांमध्ये समुपदेशन

शहरामध्ये दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत आहे. ही समस्या सोडवण्यासाठी पोलिसांबरोबरच तरुणाईचा पुढाकार गरजेचा आहे. या हेतूने वाहतूक शाखेकडून आता महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्यात येत आहे. माध्यमिक शाळा आणि महाविद्यालयांमध्ये वाहतूक शाखेचे अधिकारी समुपदेशन करत आहेत. जुलै महिन्यापासून वाहतूक शाखेतर्फे ५२ हून अधिक महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये 'रस्ता सुरक्षा अभियान'अंतर्गत सुमारे १२ हजार विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्यात आले.

**नव्या वाहतूक कायद्यानुसार शिक्षेत वाढ**

नव्याने मोटार वाहन कायद्यामध्ये केंद्र सरकारने केलेल्या बदलानुसार पालकांना मुलांच्या हातात गाडी सोपवणे महागात पडणार आहे. नव्या पारित झालेल्या कायद्यानुसार अल्पवयीन मुलांवर कारवाई केल्यानंतर प्रकरण न्यायालयात पाठवले जाणार आहे. न्यायालय पालकांना तीन वर्षांपर्यंतचा कारावास आणि पंचवीस हजार रूपयांपर्यंत दंड होऊ शकतो.

पुढारी – दि. ३ ऑक्टोबर, २०१९

# रस्त्यात बस बंद पडणे महागात

# पीएमपीला दंड

## नगर रस्त्यावर विमाननगर वाहतूक पोलिसांची कारवाई

**पुणे : प्रतिनिधी**


शहरात अनेक ठिकाणी पीएमपीएमएलच्या बस बंद पडल्याचे आपल्याला पाहायला मिळते. त्यामुळे प्रचंड वाहतूक कोंडी होते. अशीच एक बस मंगळवारी रस्त्यावर धावताना रस्त्यात बंद पडली. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत होता. या कारणास्तव वाहतूक विभागाकडून पीएमपीएमएल बसवर ५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.

वाहतूक पोलिसांकडून ब्रेक डाउन बसेसवर कारवाई सुरू करण्यात आली आहे. विमाननगर वाहतूक पोलिसांनी मंगळवारी नगर रस्त्यावर या पीएमपीएमएलच्या बसवर कारवाई केली. 'एमएच १४ सीडब्ल्यू ३१११' या क्रमांकाची बस बंद पडली होती. या बंद पडलेल्या बसमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण झाल्याने वाहतूक पोलिसांनी या बसवर पाच हजारांचा दंड लावला.

पीएमपीएमएलच्या रोज सुमारे सत्तरपेक्षा अधिक बसगाड्या रस्त्यात बंद पडतात. यामुळे वाहतुकीस अडथळा होऊन कोंडी होते. या पार्श्वभूमीवर काही महिन्यांपूर्वी पीएमपीएमएल चालकावर गुन्हे दाखल करण्यात आले होते. मात्र, तरीदेखील प्रशासनाकडून सुधारणा होत नसल्याने कारवाई करण्यात येत आहे, असे पोलिस उपायुक्त पंकज देशमुख यांनी सांगितले.



दंड ठोठावलेली बस आणि बसचा चालक.



दंडाची पावती.

# अवजड वाहनांना वाहतूक पोलिसांचा दणका

## आठ डंपर चालकांकडून ५ लाख ७० हजारांचा दंड वसूल

**पुणे: प्रतिनिधी**

प्रवेश बंदीच्या वेळी शहरात प्रवेश करणाऱ्या जड वाहनांना वाहतूक पोलिसांनी चांगलाच दणका दिला आहे. नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी आठ हायवा डंपर वाहनांवर कारवाई केली असून, त्यांच्याकडून तब्बल ५लाख ७० हजार ७०० रुपयांचा दंड वसूल केला आहे.

अवजड वाहनांना शहरात प्रवेश करण्यासाठी ठरावीक कालावधी निर्धारीत करण्यात आला आहे. तरी देखील अनेक वाहनचालक या नियमांचे उल्लंघन करत शहरात प्रवेश करतात.

त्यामुळे वाहतूकीला अडथळा निर्माण होतो. शहरात अपघात टाळण्यासाठी व वाहतूकीला शिस्त लागण्यासाठी वाहतूक पोलिस उपायुक्त पंकज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विमानतळ वाहतूक विभागाने विशेष मोहिम हाती घेतली होती.

या मोहिमे दरम्यान आठ हायवा डंपरवर कारवाई करून त्यातील सात वाहनांची आरटीओ कार्यालयाकडून तपासणी केली असता त्यामध्ये क्षमतेपेक्षा अधिक भार असल्याचे निदर्शनास आले.

पुढारी – दि. २३ ऑक्टोबर, २०१९

# प्रवाशांची लूट करणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्सवर होणार कारवाई

## आरटीओ व वाहतूक पोलिसांची मोहीम; तिकिट दरवाढीला बसणार चाप

पुणे : प्रतिनिधी

गर्दीच्या हंगामाचा फायदा घेत अनेकदा खासगी ट्रॅव्हल्स कंपन्यांकडून जादा दर आकारून प्रवाशांची लूट केली जाते. शासनाच्या नियमानुसार राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) गाड्यांच्या तिकीट दराच्या दीडपट भाडे आकारण्याचा अधिकार खासगी ट्रॅव्हल्सचालकांना देण्यात आला आहे. मात्र, या नियमाचे पालन कोणत्याही ट्रॅव्हल्स कंपनीकडून केले जात नाही. सणासुदीच्या कालावधीत तिप्पट ते चौपट दराने प्रवाशांना तिकीट दर आकारणी केली जाते. त्यामुळे अधिक भाडे आकारणाऱ्या तसेच प्रवाशांना योग्य सेवासुविधा न देणाऱ्या खासगी वाहनांवर कारवाई करण्याचा इशारा वाहतूक विभाग व आरटीओ प्रशासनाने दिला आहे.

दिवाळीनिमित्त गावी जाणाऱ्या प्रवाशांची मोठी संख्या असते. त्यामुळे राज्य परिवहन मंडळाच्या (एसटी) बसेस फुल होतात. त्यामुळे नाईलाजास्तव प्रवाशांना खासगी बसने जावे लागते. याच संधीचा फायदा घेत खासगी बस चालकांकडून प्रवाशांची आर्थिक लूट केली जाते. या सर्व गैरप्रकारांना आळा बसावा म्हणून परिवहन विभागदेखील सतर्क झाला असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या खासगी बसेसवर वाहतूक पोलिस व आरटीओकडून संयुक्त कारवाई केली जाणार आहे. दिवाळीपूर्वी ट्रॅव्हल्सचालकांना सूचना देण्यासाठी वाहतूक पोलिस उपायुक्त पंकज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी (दि.१९) येरवडा येथील वाहतूक कार्यालयात बैठक पार पडली. या वेळी आरटीओ प्रशासनातील अधिकारी, ट्रॅव्हल्स कंपन्यांचे मालक, चालक, बुकिंग एजंट उपस्थित होते.

वाहतूक पोलिसांकडून शहरात ये-जा करणाऱ्या खासगी वाहनांची तपासणी करण्यात येणार आहे. तसेच, प्रवाशांच्या सोईसाठी ज्या ठिकाणी बस पार्क केल्या जातात तेथे मुबलक पिण्याचे पाणी, प्रसाधनगृहे, सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे, सुरक्षारक्षक, वाहतूक नियमनासाठी वॉर्डन नेमणे याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच प्रवाशांसोबत ट्रॅव्हल्स व्यावसायिकांनी सौजन्याने वागावे, बसचा चालक सशक्त व सुदृढ, निर्व्यसनी असावा, असेही सांगण्यात आले आहे.

जे बसचालक जादा भाडे आकरणी करून प्रवाशांना लुटत आहेत अशा ट्रॅव्हल्स कंपन्यांची साध्या वेशातील पोलिसांकडून पडताळणी करण्यात येणार आहे. सूचनांचे उल्लंघन करणाऱ्यांवर आरटीओ प्रशासनाच्या मदतीने वाहतूक पोलिसांकडून कारवाई करण्यात येणार आहे.



> आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ट्रॅव्हल्स कंपन्यांचे मालक, चालक, बुकिंग एजंट यांना सूचना देण्यात आल्या आहेत. जर कोणी प्रवाशांना अडवून जादा तिकीट दराची आकारणी करीत असेल, अशांवर कडक कारवाई केली जाईल. तसेच, आरटीओ विभागाबरोबर वाहतूक पोलिसांचेदेखील या सर्व गोष्टींवर लक्ष राहणार आहे.
>
> **पंकज देशमुख,** उपायुक्त, वाहतूक शाखा

### तक्रार करण्यासाठी संपर्क क्रमांक

नियमानुसार ज्या ट्रॅव्हल्स कंपन्या प्रवाशांना सुविधा देणार नाहीत. तसेच, जादा तिकीट दराची आकारणी करतात, त्यांची तक्रार करण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून हेल्पलाईन नंबर देण्यात आला आहे. प्रवाशांची कुठलीही तक्रार असल्यास ती ८४११८००१०० या व्हॉट्सॲप नंबरवर करावी. तसेच, ०२०-२६६८५००० या वाहतूक नियंत्रक कक्षाच्या हेल्पलाइनवर तक्रार करण्यात यावी, असे आवाहन वाहतूक विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. त्याचा किती परिणाम होतो, हे पाहणे गरजेचे ठरणार आहे.

# Traffic police register 11,682 drinking and driving cases

SUSHANT RANJAN
@SusRanjan

**PUNE:** The Pune city traffic police have tightened the rules for drivers who drive vehicles after drinking alcohol. The police have registered 11,682 cases from January to October 20 this year. The highest number of cases registered in April with 2,702 and 504 cases in August.

As per the report provided by DCP (Traffic) Pankaj Deshmukh, the highest number of cases registered with Koregaon Park traffic division is 945.

| Traffic Division | Cases |
|---|---|
| Koregaon Park | 945 |
| Wanawadi | 768 |
| Vimantal | 736 |
| Bharati Vidyapeeth | 660 |
| Hadapsar | 660 |
| Warje | 654 |
| Faraskhana | 588 |
| Dattawadi | 584 |
| Sahakar Nagar | 580 |
| Yerawada | 533 |

"Most of the cases are registered on weekends. We will continue to take action against drunk and driving," said Deshmukh.

| Month | Cases |
|---|---|
| January | 532 |
| February | 1,049 |
| March | 1,866 |
| April | 2,702 |
| May | 1,435 |
| June | 1,238 |
| July | 1,489 |
| August | 504 |
| September | 622 |
| October (20) | 245 |

"The person found drinking and driving will be produced in the court. There is no spot fine, but the action is taken by the court," he added.

Sakal Times - 26 October, 2019

VACATION RUSH

# Police, RTO crack down on offenders

## Action taken against 45 luxury buses for charging exorbitant fares from passengers

ST CORRESPONDENT
reporters@sakaltimes.com

**PUNE:** In a joint action, the Pune city police Traffic Branch and the Regional Transport Office (RTO) have taken action against 45 private luxury buses in which passengers were made to pay exorbitant fares in the run-up to the Diwali festival.

As people are rushing back to their hometowns for the celebrations, many operators are cashing in on the situation. As per the officials, the bus operators cannot charge more than 1.5 times the normal fare charged by the Maharashtra State Road Transport Corporation (MSRTC) buses. However, it is being seen that many operators are charging very high fares.

Last week, DCP (Traffic) Pankaj Deshmukh had convened a meeting of bus operators and conveyed the government's decision of not charging more than prescribed fare. However, many operators are still charging high fares. The police received complaints on WhatsApp number 8411800100 as well as their Twitter handle @PuneCityTraffic. Accordingly, action was taken against errant bus operators.

"We appeal to people to approach us with tickets if they were charged more than the prescribed fares. Legal action is being taken against the bus operators", said DCP Deshmukh.

RTO Ajit Shinde said the drive is continuing with help from traffic police. "We are sending details of those charged, such as permit, licence numbers to the transport commissioner, who issues permits to bus operators, for further action. This action may lead to impounding of buses as well as cancellation of permits and licences. We appeal to people to approach police if any bus operator is overcharging fare."




**UNDER THE LENS:** The Pune traffic police and RTO are conducting a joint drive against private luxury bus operators for overcharging during the festive season.

### PASSENGERS ARE FUMING...

- "Diwali is the most awaited festival for students who live far from their hometowns. But the fares of buses as well as flights have skyrocketed. Usually, I travel from Pune to Nagpur in Rs 800 but this time I paid Rs 1,800. I had to pay Rs 1,000 extra to celebrate Diwali with my family," said Pooja Pradhan, a student.

- Zubin Hamine, a techie residing in Wakad, said, "This has become the norm every year. I paid Rs 7,500 for two tickets to Indore in Volvo bus. Normal fare is Rs 2,600 to 2,800 per person. I don't mind it, as it is still less than air fare."

# Two-wheeler lanes help reduce congestion on Aundh-Baner road

Pics courtesy: Pune traffic police





Police said the queue of vehicles reduced by around 50 metres after the demarcated two-wheeler lane was introduced

**Pune:** The recently-demarcated two-wheeler lane on the busy section of Baner Road and Aundh Road near Savitribai Phule Pune University has helped reduce the traffic congestion in the area, said police.

"The two-wheeler lane, which was demarcated two days ago, has been able to reduce traffic snarls. Earlier, there would be traffic till Yashada. For the past two days, we have seen that the queue of vehicles has reduced by 50-60 metres," said Prakash More, assistant police inspector, Chatushrungi police.

"The reason is when two-wheelers come between four-wheelers, more space is lost. If two-wheelers are on one side, it helps reduce overall traffic congestion by placing four-wheelers one after the other in an orderly fashion," he said.

The city traffic police as well as the commissioner of police had recently sought suggestions from commuters on ways to reduce traffic congestion in the area. In response, two-wheeler drivers demanded installation of steel bollards for demarcation and strict action against autorickshaws trying to wiggle their way into the lane specified for two-wheelers.

"The demarcated lane will enable two-wheeler riders to quickly cross the crowded university circle. Four-wheeler drivers, too, do not have to worry about two-wheeler riders wiggling their way through gaps between two cars, which often leads to traffic chaos. However, there is a need to make sure that the left side of the road is devoid of rubble, doesn't get water-logged or have potholes. Otherwise, two-wheeler riders will use the main road, leaving a huge chunk of the road unusable for all types of vehicles," said Vijay Pande, a sales professional.

Some commuters, while replying to the police tweet, said that while the decision is good, the bollards should be on a permanent basis. "The plastic bollards are easily knocked down by autorickshaws or four-wheeler riders. It will be better if steel bollards are installed," said Nikku Joglekar.

More said that earlier they had thought of keeping the bollards in a manner to ensureenough space for two-wheelers to move simultaneously. "Others tried to take advantage of this and even four-wheeler drivers would try to pass through the lane. This time we have done it in a manner that only one two-wheeler can pass through," he said.

Chandragupt Goyal, who regularly commutes between Shivajinagar and Baner, said that despite the two-wheeler lane till the university signal, traffic diverges after crossing the signal into one that goes towards Senapati Bapat Road, and the other towards Shivajinagar. "Two-wheeler riders who want to go towards SB road, have to come from extreme left to the extreme right, which again leads to bit of a problem," he said.

# Appreciation Letter...

To,
Dr. K. Venkatesham
Commissioner of Police, Pune City

Respected Sir

We would like to take an opportunity to express our heartfelt gratitude for the immense help we received from the Bibwewadi Police Personal. World came crashing down on us when we lost our father and our mother was seriously wounded. It was Police Nayak Mr. Bhosle (6481) who noticed that she was still alive and alerted the family who immediately took her to hospital. Our mother is alive today because of the timely help imparted by the Bibwewadi police.

In the time of grief we were helped by ASI Mr. Mahajan and PC Mr. Yadav with the legal formalities in Sasoon Hospital.

We would always be indebted for the assistance provided by the whole team of Bibwewadi Police. A special word of gratitude especially for PSI Mr. Atul Thorat (for his emotional and overall assistance), PN Mr. Devkute (7546) & PC Mr. Lokhande (has been very helpful while recording our statements and apologized to us in case of delays). The whole team was lead by PI Mr. Kumar Ghadge.

Like every law abiding citizen we used to be scared of police and police stations but our experience with the Bibwewadi Police has completely changed our perception.

We (the sister duo) apart from indebted will always be available and more than happy to be of any help to the Pune Police.

Unfeigned Regards,
Daughters of a doting father

P.S. We would be very happy if this mail would be shared over the social media and other forums but request you not to reveal our identity.


150 women rescued fr
sex rackets since Janu
पोलिसांनी साजरी केली गरिबाच्या घरी दिवाळी
अहमदनगर खुनातील गुन्हेगार गजाआड
खवल्या मांजराच्या विक्रीसाठी आलेल्या तिघांना अटक
दीड कोटींची ब्राउन शुगर जप्त
बुधवार पेठेतील वेश्याव्यवसायावर छापा
बोनस देण्याच्या बहाण्याने फसवणूक करणाऱ्याला अटक
3 held for possession of pangolin; third case in 10 months
कोकेन विक्री करणारा नायजेरियन अटकेत
बेकायदा पिस्तूल बाळगणारा अटकेत
अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या दाम्पत्याला अटक
Cops bring back minor who ran off from home
पोलिसांच्या योग्य नियोजनामुळे मतदान शांततेत
पळालेला मुलगा पालकांकडे सुपूर्द
हरवलेल्यांच्या शोधासाठी पोलिसांचा मिसिंग सेल
गुन्हे शाखेच्या विशेष पथकाकडून २२ फरारी आरोपींना अटक
दाम्पत्याने एकत्र जीवन संपवायचे ठरविले...
...पण नियतीला त्यांचा निर्णय नव्हता मान्य
लॉटरी जुगार
स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी ती आली पुण्यात
पोलिसांमुळे पालकांकडे पोहोचली सुखरूप परत
लग्नाच्या आमिषाने फसवणारा झाला गजाआड
फसविणारे दोन नायजेरियन जाळ्यात
Crime Branch Unit III nabs duo with drugs worth ₹77L
रिक्षात विसरलेले दागिने मिळाले परत
पोलिसांनी सीसीटीव्हीवरून काढला माग
संघटनांतर्फे महिला पोलिसांचा सन्मान
खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यातील फरारी पोलिसांच्या जाळ्यात
पोलिस आयुक्तांची
गुंडगिरी 'सफाई' मोहीम सुरू
'दामिनी'ने अल्पवयीन मुलीला दिले आई-वडिलांच्या ताब्यात
Cops bring back minor who ran off from home
विधिसंघर्षित मुलां...
भांडण करून पळालेला मुलगा सुखरूप परत
स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी ती आली पुण्यात
जीवन संपवायचे ठरविले...
त्यांचा निर्णय नव्हता मान्य!
मोबाईल वेडापायी मुलीने सोडले घर
रिक्षात विसरलेले दागिने मिळाले परत
खून करणाऱ्या म्होरक्यासह पाच जणांना अटक
फसवणूक करणाऱ्याला दिल्लीतून अटक